आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे अंक अकरावा पृष्ठे ०९ नोव्हेंबर २०२३ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ 'जीवन विकास केंद्र' - जीवन मरणाच्या उंबरठ्यावर ?

पान ०३ 'आशिआना' चौकटीपलीकडची वाटचाल

पान ०५ बेशक मंदिर मस्जिद तोडो...

पान ०७ विसरलेले समाज ७ : सेल्कनाम आणि यामाना







## 'CHAMPION'S ZONE' - विशेष मुलांच्या खेळाडू वृत्तीला भरारी




'CHAMPION'S ZONE' नावाच्या स्टार्टअपद्वारे क्रीडा क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी साठे महाविद्यालयातील अभिषेक झा या उत्साही विद्यार्थ्यांनी विशेष मुलांसाठी 'खेळ- ऊर्जा' या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा २९ नोव्हेंबर रोजी साठ्ये महाविद्यालयातील टर्फ मध्ये आयोजित केली आहे. या स्पर्धेमध्ये मुंबईतील १४ शाळांपैकी ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. मुंबई अंध क्रिकेट संघाच्या सहकार्याने एका विशेष अंध क्रिकेट सामन्याचा या कार्यक्रमात समावेश आहे. क्रिकेटसोबतच, 'खेळ-ऊर्जा' मध्ये लिंबू चमचा शर्यत, बटाट्याची शर्यत यासारखे वैयक्तिक खेळ दाखवले जातील.

अभिषेक झा च्या 'CHAMPION'S ZONE' चे मूळ उद्दिष्ट मुली, महिला आणि विशेष दिव्यांग मुलांवर लक्ष केंद्रित करून खेळ या क्षेत्रात त्यांना संधी देण्याचे आहे. सहभागी झालेल्या स्पर्धकांना नाष्टा, स्नॅक्स आणि दुपारचे जेवण दिले जाईल. उपस्थितांसाठी हा एक उत्स्फूर्त अनुभव असेल. या स्पर्धेचे काही फोटोज्, व्हिडिओ आणि काही खास क्षण parlebazaar.com या वेबसाईटवर तसेच सोशल मिडिया चायनलवरही अपलोड होतील.




## संपादकीय

नुकताच दीपावलीचा आनंदोत्सव पार पडला आहे. विविध सांगीतिक कार्यक्रमांनी नटलेला, रोषणाईने सजलेला व पंचपक्वानांनी भरगच्च भरलेला हा सण आपण पार्लेकर दर वर्षी उत्साहात साजरा करतो तसा ह्या ही वर्षी केला. तसे पाहता दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे महत्व विशद करण्यासाठी आपल्या पुराणात अनेक कथा आहेत. धर्म व निसर्ग ह्याची फार सुंदर व घट्ट सांगड आपल्या पूर्वजांनी घातली होती ह्यात शंका नाही. अर्थात सध्याच्या काळात मुंबई सारख्या निसर्गाच्या फारश्या खूणा शिल्लक न राहिलेल्या शहरात ह्या गोष्टींचे औचित्य उरले नाहीये हे ही तितकेच खरे आहे. आपल्या सारख्या सामान्य लोकांसाठी हा एक आनंदाचा, मित्र- नातेवाईकांच्या गाठी भेटी घेण्याचा, मनोरंजनाचा, गोड धोड खाण्याचा आणि नेहमीच्या routine चा शीण घालवण्याचा काळ असतो व त्यात काही वावगेही नाही.

दिवाळी हा हिंदूंचा सण आहे. असे म्हणतात कि एके काळी, म्हणजे ख्रिस्त जन्माच्या आधी जगातील अनेक भागात वैदिक संस्कृती नांदत होती. आजही त्याच्या खुणा आपल्याला अनेक ठिकाणी व अनेक प्रकारे दिसतात. आपल्या आजूबाजूच्या देशांमध्ये तर ती होतीच पण बाली, कंबोडिया, थायलंड मधील हिंदू मंदिरे, मध्य पूर्वेमधील अनेक प्राचीन वास्तू, अनेक लॅटिन व इंग्लिश शब्दांची संस्कृत व्युत्पत्ती (mother - मातर, brother - भ्रातर, september - सप्त अंबर या सारखे असंख्य) हे सर्व हेच दर्शवतात. पुढे काळाच्या ओघात अनेक पंथ, धर्म अस्तित्वात आले, धर्मान्तरे झाली पण अनेक ठिकाणी आजही प्राचीन संस्कृती जपली जाते, पुजली जाते. म्हणूनच दिवाळी हा सण आज फक्त भारतातच नव्हे तर अनेक देशात साजरा होतो. फक्त हिंदू धर्माचेच नव्हे तर इतर धर्मांचे, पंथांचे लोक सुद्धा आज दिवाळीच्या आनंदात उत्साहाने सहभागी होताना दिसतात. दुबईतील 'बुर्ज खलिफा' वरची रोषणाई, अमेरिकेतील व्हाईट हाउस मधील सोहळा हे ह्याचेच द्योतक नव्हे काय ?

सर्वांना 'आम्ही पार्लेकर' तर्फे दिवाळीच्या व नववर्षाच्या खूप खूप शुभेच्छा !


**पार्लेकर**

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


## 'जीवन विकास केंद्र' - जीवन मरणाच्या उंबरठ्यावर ?

१ नोव्हेंबर २०२३ रोजी कै. सदानंद दणाईत निर्मित 'जीवन विकास केंद्राने' आपला ५१ वा वर्धापन दिन साजरा केला. कै. दणाईत यांचे कार्य पार्ला अंधेरीत कोणाला माहित नाही ? दणाईत काँग्रेस पक्षाचे होते. खूप शिकलेले नसले तरी सामाजिक कार्य, समाजाच्या गरजा, वेदना ओळखून त्या दूर करण्यासाठी झटणारे असे हे व्यक्तिमत्व. त्यांनीच जीवन विकास केंद्राची निर्मिती केली. त्याच्या उद्घाटनाला तत्कालीन पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांना प्रमाणात थकीत राहिले. तेव्हा वीजतोडणी होऊन रुग्णांचे हाल होऊ नयेत यासाठी वरिष्ठ डॉक्टरांनी स्वत:च्या खिशातून बिल भरले. इमारतीच्या डागडुजीचे काम नितांत गरजेचे आहे. वर्धापन दिनाची नेहमीची पूजा, भजन आदी गोष्टी स्टाफ व डॉक्टर स्वत:च्या पैशातून (स्वत:चे पगार अडकलेले असूनही) करत आहेत. आज जे रुग्णालय चालू आहे ते स्टाफ व डॉक्टर्स यांच्या दणाईत यांच्या प्रती असलेल्या निष्ठा, प्रेम व सामाजिक बांधिलकीच्या भावानेतून चालू आहे.




आणले. येथे रुग्णालय, औषध दुकान, वाचनालय, रक्तपेढी, रुग्णवाहिका या सोयी सर्वसामान्य माणसांसाठी अत्यंत माफक दरात परंतु दर्जेदार उपलब्ध करून दिल्या. एमआरआय, सिटीस्कॅन, सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथॅलॉजी अशा सर्व वैद्यकीय चाचण्या, फिजीओथेरपी, डायलेसिस सारख्या सेवा येथे निर्माण केल्या. उत्तमोत्तम डॉक्टर शोधून कमी पैशात त्यांनी सामान्य आर्थिक परिस्थितीतल्या रुग्णाला त्यांच्या विद्वत्तेचा लाभ मिळवून दिला. वैद्यकीय व सांस्कृतिक अशा उत्तम सेवा पार्लेकरांना मिळवून दिल्या.

मात्र दणाईताच्या निधनानंतर हळूहळू रुग्णालय उतरणीला लागलेले दिसून आले. हळूहळू एम आर आय मशीन, सिटीस्कॅन मशीन व त्यापाठोपाठ सोनोग्राफी मशीन विकून टाकले गेले. रक्तपेढी बंद झाली. औषध दुकान बाहेरच्यांना चालवायला दिले गेले. कोविड नंतर तर परिस्थिती अजूनच खालावली आहे. त्यांचा वारसा हक्क सांगणाऱ्या त्यांच्या तीनही मुलीत वाद विकोपाला गेले आहेत. चॅरिटी कमिशनने वारंवार सांगूनही ते मिटण्याची लक्षणे दिसत नाहीत. रुग्णालय आर्थिक कोंडीत सापडले असून तेथील स्टाफला चार महिन्यांचा पगारही मिळालेला नाही. बहुतेक जुने डॉक्टर आजही तिथे निष्ठेने काम करत आहेत. मात्र त्यांनाही त्यांचा मोबदला महिनोंमहिने मिळत नाही. येणारा पैसा, निधी चॅरिटी कमिशन कडे आता जातो. त्यांच्याकडून रोजच्या खर्चासाठी वापरायला पैसा मिळवणे यासाठी अनेक मान्यवर डॉक्टरना चॅरिटी कमिशनच्या ऑफिसात खेटे घालत राहणे भाग पडते. रुग्णालयाचे वीज बिल मोठ्या

पण हे किती काळ खेचणार ?

आज पार्ला अंधेरी पूर्वेला माफक पैशात वैद्यकीय सेवा देणारे एकही रुग्णालय नाही. जी आहेत ती सर्व खाजगी व दाम दुप्पट दाम घेणारी. पण नाईलाजाने सामान्य माणसाला तेथे जावे लागते. तेथील बिले भागवता भागवता त्यांचा फार चेंदामेंदा होऊन जात आहे. कै. सदानंद दणाईत यांनी सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेले व वैभवाला नेलेले रुग्णालय त्यांचे वारसदार अंतर्गत कलहातून रसातळाला नेणार का? पन्नास वर्षांची एक सेवाभावी संस्था व पार्ल्याचे आरोग्य यांच्याशी स्वत:च्या स्वार्थासाठी या भगिनी कुठवर खेळणार आहेत ? त्यांना समजावू शकेल असं पार्ल्यात कोणीच मान्यवर नाहीत का ?

एक उत्तम संस्था अशा पद्धतीने नामशेष होऊ नये यासाठी सर्व पार्लेकरांनी यात काय उपाययोजना करता येईल ? यासाठी कार्यरत होणे गरजेचे आहे. पण सर्वात महत्त्वाचे तीनही भगिनींनी एकत्र येऊन आपसी मतभेद सोडवण्यासाठी व आपल्या कर्तृत्ववान वडिलांचे नाव उज्वल राखण्यासाठी थोडा समजुतदारपणा दाखवावा. अशी सर्वच पार्लेकरांतर्फे 'आम्ही पार्लेकर' त्यांना जाहीर विनंती करत आहोत.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

## 'आश्लेषा'
### वाचकांसाठी मेजवानी

गेल्या १२ वर्षा पासून संपादक अशोक तावडे यांनी मोठ्या आत्मीयतेने 'आश्लेषा' दिवाळी अंकाला दर्जा मिळवून दिला आहे. या वर्षीच्या अंकाला प्रसिद्ध साहित्यिक अशोक बेंडखळे हे अतिथी संपादक म्हणून लाभले त्यांची चाळीसच्यावर दर्जेदार पुस्तके प्रकाशित झाल्यामुळे त्यांच्या प्रदीर्घ अनुभवी कारकिर्दीतून या अंकाने एक साहित्यिक आकार घेतला आहे. अनुवादित कथा हे 'आश्लेषा' च्या १२व्या अंकाचे आकर्षण आहे. रेखा बैजल, गुरुनाथ तेंडुलकर, सुधीर सुखठणकर, नीलिमा भावे इ. लेखकांनी कथेच्या विभागासाठी सहभाग दाखवला आहे.




वैचारिक लेख या विभागात डॉ. अनंत देशमुख, डॉ. स्वाती तुपे,दीपा मंडलिक, मधुकर धर्मापुरीकर, केशव परांजपे, एकनाथ आव्हाड,रमेश सावंत, आदींनी सजविला आहे. तर अनेक थोर साहित्यिक यांचे हे जन्म शताब्दी वर्ष असून जी. ए. कुलकर्णी, वसंत बापट, शांता शेळके, लोकशाहीर साबळे यांच्या कारकिर्दीचा वेध या अंकात घेतला गेला आहे. अंकाचा हळवा कोपरा म्हणजे कविता विभाग त्यात प्रा. प्रतिभा सराफ, प्रमोदकुमार अणेराव, राजीव जोशी, महेश कराडकर आणि गितेश शिंदे अशा अनेक कवींनी रंगविला आहे. एकूणच अंकाचे साहित्यिक मूल्य हे उच्च श्रेणीतले असून या अंकाला अनेक वर्षापासून एक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.या अंकाचे मुखपृष्ठ बेळगावचे प्रसिद्ध चित्रकार किरण हणमशेठ यांनी चितारले असून कला निर्देशक म्हणून सतीश खानविलकर यांनी अंकाची बाजू सांभाळली आहे.



# 'आशिआना' - चौकटीपलीकडची वाटचाल

''एकाच एका गोष्टीवर लक्ष केंद्रित करून काम करत राहिल्यामुळे आपल्या जगण्यात खूप काही महत्वाचं बघायचं, करायचं राहून गेलं की काय'', असा प्रश्न 'आशिआना'ची अवघी वाटचाल समजून घेताना पडला, असे उद्गार रविवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी 'आशिआना'च्या पंचविसाव्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे गायक-संगीतकार मिलिंद जोशी यांनी काढले. त्यांचं हे विधान आपल्यापैकी अनेकांना विचार करायला भाग पाडू शकतं.

सुहासिनी आणि रवी मालदे या अतिशय यशस्वी आर्किटेक्ट दाम्पत्याच्या नात्यागोत्यात दूरदूरपर्यंत कुणालाही ऑटिझम नाही. पण परिचयातल्या कुणामुळे तरी 'ऑटिझम' ही गुंतागुंतीची समस्या आणि त्यामुळे त्या मुलाच्या



आणि त्याच्या पालकांच्या वाट्याला येणारा खडतर जीवनप्रवास त्यांनी जवळून पाहिला आणि समाजातील या घटकासाठी काहीतरी केलं पाहिजे असं त्यांना मनापासून वाटलं. आपल्यापैकी अनेकांना कित्येकदा मनापासून अशी तळमळ वाटते खरी, पण प्रत्यक्षात त्या दिशेने फारसं काही केलं जात नाही. पण मालदे दाम्पत्याचं मात्र तसं नव्हतं आणि नाही.

ज्या काळी 'ऑटिझम' हा शब्द आपल्याकडे पूर्णत: अपरिचित होता अशा काळात त्यांनी ऑटिस्टिक मुलांसाठी संस्था सुरू करण्याच्या दिशेने विचार सुरू केला. १९९४ च्या सुमारास अवघ्या पाच ऑटिस्टिक मुलांसोबत एका छोट्याशा फ्लॅटमधून त्यांनी या प्रकल्पावर प्रत्यक्ष काम सुरू केलं आणि ऑक्टोबर १९९८ मध्ये 'आशिआना इन्स्टिट्यूट फॉर ऑटिझम'ची स्थापना झाली. तेव्हापासून 'आशिआना'ची वाटचाल गेली २५ वर्षं अव्याहतपणे आणि यशस्वीपणे सुरू राहिली आहे. आजमितीस 'आशिआना इन्स्टिट्यूट फॉर ऑटिझम' या स्पेशल स्कूलमधून ५००च्या वर मुलं शिकून, प्रशिक्षित होऊन बाहेर पडली आहेत. ही वाटचाल निश्चितच अतिशय प्रेरणादायी आहे आणि त्याचंच दर्शन 'आशिआना'च्या २५व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात घडलं. ऑटिझम हा एक 'स्पेक्ट्रम' आहे. यातली कमी किंवा मध्यम तीव्रतेचा ऑटिझम असलेली मुलं आज काही प्रमाणात मुख्य प्रवाहातील शाळांमधून शिकत असली, तरी अधिक तीव्रतेचा ऑटिझम असणाऱ्या मुलांचे शिक्षण-प्रशिक्षण हे आव्हानात्मक काम विशेष शाळांमधूनच होऊ शकते. पण म्हणून या मुलांनी मुख्य प्रवाहातील शाळांच्या जगापासून दूर रहावे का? खरे तर, मुख्य प्रवाहातील प्रत्येक शाळेच्या आवारातच एक विशेष शाळा असायला हवी आणि त्यातून जी ऑटिस्टिक मुलं मुख्य प्रवाहात सामावली जाऊ शकतात, ती तशी



सामावली जायला हवीत. 'आशिआना'च्या आणि तिथे शिकणाऱ्या मुलांच्या सुदैवाने हा अतिशय आदर्श असा परिसर त्यांना प्रत्यक्षात लाभला आहे. नित्यानंद मार्ग म्युनिसिपल स्कूलच्या आवारात असलेल्या या शाळेत ही मुलं इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणेच नृत्य, योगा, सायकलिंग, स्केटिंग आदी सांस्कृतिक-क्रीडात्मक कौशल्यांचा आनंद लुटत चित्रकला, हस्तकला आदी कौशल्यंही शिकत आहेत याचं अतिशय उत्तम प्रातिनिधिक प्रतिबिंब रविवारच्या कार्यक्रमात उमटलं होतं. 'आशिआना'च्या मुख्याध्यापिका व अन्य शिक्षक, थेरपिस्ट यांच्या नित्याच्या प्रामाणिक धडपडीतूनच हे शक्य झालं होतं. शाळेच्या व्यवस्थापनानेही या साऱ्यांचा यथोचित सत्कार यावेळी केला.

सुहासिनी मालदे यांच्या 'एक इझम निरागस' या मराठी पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादाचं प्रकाशनही यावेळी झालं. डॉ. प्रिया नितीन गोखले यांनी हा अनुवाद केला आहे. हा अनुवाद करणं किती संपन्न करणारं होतं हे डॉ. गोखले यांनी यावेळी सांगितलं. मराठी, गुजराती आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये आता उपलब्ध असलेलं हे पुस्तक त्यातील आगळ्या अनुभवांचा प्रत्यय घेण्यासाठी निश्चितच वाचायला हवं.

आर्किटेक्चरच्या जगातील आपली वाटचाल यशस्वीरीतीने करतानाच सुहासिनी आणि रवी मालदे यांनी 'आशिआना' ही विशेष शाळा २५ वर्षं अनेक आव्हानांना तोंड देत उत्तमरित्या सुरू ठेवली आहे हे निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. जगण्याकडे पाहण्याची त्यांची ही आगळी सकारात्मक दृष्टी किमान काही जणांना तरी आपल्या जगण्याच्या संकुचित चौकटीच्या पलीकडे पाऊल टाकण्यासाठी प्रेरित करणारी ठरावी.



**आशा कबरे-मटाले**
९८२१३७११४०



# ‘अनुस्वर’ च्या शिरपेचात अजुन एक मानाचा तुरा

रविवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी देशस्थ ऋग्वेदी संघ येथे अनुस्वर संस्थेचा ‘ओ साथी रे.... ’ हा कार्यक्रम मोठ्या थाटात आणि उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन अनुश्री क्षीरसागर यांनी केले. मेधा, शर्मिला, डॉ. वैशाली, स्वराली, अनुश्री, सचिन, डॉ. मंदार, विनायक , दिनेश , अजय, आदित्य या साऱ्या कलाकारांनी आपली गाणी उत्तम प्रकारे सादर केली.

श्री मिलिंद प्रभावळकर यांनी बॅनर, जाहिरात तसेच तांत्रिक गोष्टी सोबतच व्हिडिओ शूटिंगची संपूर्ण जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमाला मुंबई महानगरपालिकेच्या के ईस्ट विभागाचे माजी नगरसेवक श्री अभिजीत सामंत, महाराष्ट्र टाइम्स चे माजी संपादक श्री अशोक पानवलकर, श्री मुकुंद काका सराफ, डॉ. नीता व डॉ. राजीव कानिटकर असे विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# ‘ग्राहक पेठ’ - लघुउद्योग, गृहउद्योजक व महिला उद्योजकांच्या हक्काची जागा

लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेची रेखा चिटणीस पुरस्कृत ३९ वी ग्राहकपेठ शुक्र दि. २७ ऑक्टो ते रवि. दि. ५ नोव्हेंबर या




कालावधीत संपन्न झाली. लघुउद्योजक, गृहउद्योजक व विशेषत: महिला उद्योजकांना या ग्राहकपेठेमधे संधी दिली जाते. खाद्यपदार्थापासून दागिन्यांपर्यंत विविध वस्तूंचे सुमारे १२५ गाळे असलेली ही ग्राहकपेठ संस्थेचे स्वा. सावरकर पटांगण व संस्थेच्या इमारतीतील गोखले सभागृह, पु. ल. देशपांडे सभागृह व काळे सभागृह येथे भरली होती. लोकमान्य सेवा संघाच्या या ग्राहकपेठेत नाशिक, सांगली, चिपळूण, माथेरान इत्यादी ठिकाणच्या गाळाधारकांनी भाग घेतला होता. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील प्रांतातील उद्योजकही सहभागी झाले होते. मुंबई उपनगरात विशेष प्रसिद्ध असलेल्या या ग्राहकपेठेत शेकडो लोकांनी खरेदीचा नंद घेतला. अनेक मान्यवरांनीही ग्राहकपेठेस भेट



दिली. त्यात महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री व मराठी भाषा राज्यमंत्री मा. श्री. दीपक केसरकर यांनी रविवार दि. ५ नोव्हेंबरला संस्थेच्या ग्राहकपेठेस सदिच्छा भेट दिली. गाळाधारकांना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके दिली जातात. या वर्षीचा हा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दि. २ नोव्हेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद चितळे व विलेपार्ल्याचे लोकप्रिय माजी नगरसेवक श्री. अभिजित सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. ग्राहकपेठेच्या शिस्तबद्ध योजनामुळे व ग्राहकांच्या प्रतिसादामुळे गाळाधारक समाधानी होते.





# बेशक मंदिर मस्जिद तोडो...

चित्रपट मेरा नाम जोकरच्या अपयशामुळे ग्रेटेस्ट शोमन राजकपूर कर्जबाजारी झाले. इतके की त्यांना घर, आर. के. स्टुडिओ, पत्नीचे दागिने वगैरे सारी मालमत्ता गहाण ठेवावी लागली. यातून बाहेर पडण्याचा एकच उपाय होता तो म्हणजे हमखास यश देणाऱ्या चित्रपटाची निर्मिती. घरचेच कलाकार घेऊन.. 'कल आज और कल'.. या चित्रपटाची निर्मिती केली. पण तो फार चालला नाही. वेळेत कर्ज फिटलं नाही तर गहाण ठेवलेल्या वस्तू विकून टाकाव्या लागल्या असत्या. त्यामुळे त्यांनी अतिशय छोट्या बजेटमध्ये चित्रपट निर्माण केला.. 'बॉबी' ..दोन किशोरवयीन मुंबई स्थित प्रेमी. श्रीमंत हिंदू



चा मुलगा राज आणि साध्याश्र्या ख्रिश्चन कोळ्याची मुलगी बॉबी एकमेकांच्या प्रेमात पडतात. काही कारणाने राज आणि बॉबी यांच्यात गैरसमज निर्माण होतात. दोघेही एकमेकांपासून दुरावतात. या पार्श्वभूमीवर येतं गाणं.. 'बेशक मंदिर मस्जिद तोडो' .. या गाण्याबद्दल आज आपण बोलणार आहोत. नरेंद्र चंचल यांच्या स्वरातलं डफाच्या साथीतलं हे गाणं पडद्यावरही चंचल यांच्यावर चित्रित केलं आहे. अमृतसर इथे पंजाबी हिंदू कुटुंबात जन्म झालेले नरेंद्र चंचल हे मुख्यत: भजन आणि आरती गायक होते. मुंबईत बैसाखी निमित्त आलेल्या ऑर्केस्ट्रामध्ये राज यांनी त्यांचा आवाज ऐकला आणि त्यांच्या पहाडी आवाजावर फिदा झाले. १९७३ साली आलेल्या बॉबी चित्रपटातील.. 'बेशक मंदिर मस्जिद तोडो' .. हे भैरवी गीत त्यांच्याकडून गाऊन घेतलं. हे गाणं इतकं गाजलं की त्यांच्या या पहिल्याच गाण्यासाठी त्यावर्षीचं फिल्मफेअर पुरुष गायक अवॉर्ड त्यांना मिळालं. सतराव्या शतकातील पंजाबी तत्ववेत्ता आणि सूफी संत बाबा बुले शाह यांच्या सूफी भजनावर रचलेलं हे गाणं गीतकार इंद्रजीतसिंग तुलसी यांनी लिहिलं आहे. 'प्यार भरा दिल कभी ना तोडो, इसमे दिलवर है रहता..' प्रेम अतुलनीय आहे, त्याची सोन्याचांदीने तुलना करू नकोस.. असे प्रेमाची महती सांगणारे दोहे एकापुढे एक रचले आहेत. या गाण्याने इतिहास घडवला. यानंतर चंचल यांनी अशा प्रकारची 'चलो बुलावा आया है, तूने मुझे बुलाया शेरावालिये.. मैं बेनाम हो गया' अशी अनेक सुप्रसिद्ध गाणी हिंदी चित्रपटांसाठी गायली. ते वैष्णोदेवी भक्त होते. दर वर्षी २९ डिसेंबर ला कटरा इथे पोहोचत. वर्षअखेरीस देवीला गानसेवा अर्पण करत.

चित्रपटाची कथा ख्वाजा अहमद अब्बास यांची आणि पटकथा वसंत साठे यांची होती. कर्जातून बाहेर पडण्यासाठी राज कपूर ने काढलेला हा चित्रपट. चित्रपटातील कलाकार, आउटडोअर शूटिंग, संगीत जिथे म्हणून शक्य होतं तिथे कात्री लावली कारण खर्च करायला पैसे नव्हते. प्राण आणि प्रेमनाथ जवळचे मित्र. त्यांनी मानधन घेतलं नाही. पुत्र ऋषी कपूर याने आधीच्या चित्रपटात किशोरवयीन राज कपूरचं काम केलं होतं.



त्याला च नायक म्हणून घ्यायचं ठरलं. अशासाठी नाही की आपल्या मुलाला चित्रपटसृष्टीत आणायचं होतं पण मोठा कलाकार घ्यायचा तर मानधन देण्यासाठी तेवढे पैसे नव्हते. नायिका त्याच्या वयाला शोभेल अशी हवी होती. ती डिंपल कापडिया मिळाली. अठरा वर्षांचा ऋषी आणि सोळा वर्षांची डिंपल. दोघांचाही प्रमुख भूमिका असलेला पहिला चित्रपट. बदलली नाही फक्त एक गोष्ट.. गायिका लता मंगेशकर.. कारण ती असेल तर चित्रपट चालेल अशी राज ची धारणा होती. शंकर जयकिशन त्याचे नेहमीचे संगीतकार. पण त्यांचा लताबाईंबरोबर वाद होता. त्यामुळे राजने संगीतकार जोडी बदलली. लक्ष्मी प्यारे यांना आणले. १९ वर्षीय गायक शैलेंद्रसिंग ऋषी कपूर यांचा आवाज म्हणून नावारूपास आला. गीतं शैलेंद्र यांच्यासह विठ्ठल भाई पटेल यांनी लिहिली. डिंपल रातोरात स्टार झाली तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. चित्रपट भारतातच नव्हे तर सोवियत रशियातही तुफान चालला. किशोरवयीन नायक नायिका आणि जोडीला गरीब श्रीमंत असा फरक लोकांना आवडला. राजकपूर यांना आर्थिक संकटातून अलगद बाहेर काढणारा हा चित्रपट यंदा जन्माचा सुवर्ण महोत्सव पूर्ण करत आहे .. आणि तरीही राज यांच्या स्वत:च्या क्लासिक चित्रपटांच्या यादीत बॉबी ला स्थान नाही.. तो त्यांच्या लेखी दुय्यम गल्लाभरू चित्रपट राहिला आहे.



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२






# विलेपार्ले गणेशोत्सव २०२३

सालाबाद प्रमाणे याही वर्षी पार्लेकरांनी मोठ्या उत्साहात श्री गणेशोत्सव साजरा केला. नुकताच झालेला टी - २० समिट आणि चंद्रावर भारताने केलेली स्वारी या पार्श्वभूमीवर गणेशाचं दिमाखात आगमन झालं. बाकी मिरवणुका, संगीत, रोशनाही भव्य मंडप, भंडारे, पूजा आणि भाविकांच्या रांगा हे तर नेहेमीचच दृश्य होतं पण



गणेशोत्सवाने काहीतरी वेगळं दिलं पाहिजे. एका सुसंस्कृत समाजाचे दर्शन घडले पाहिजे आणि लोकमान्य टिळक तसेच छत्रपती शिवाजी हमहाराजांची चित्रे जशी लावतात त्याचप्रमाणे त्यांचे विचारही थोडे प्रसारित केले पाहिजेत. तसेच १४ विद्यांचा आणि ६४ कलांचा देव म्हटलं की वेगवेगळ्या कलांच्या स्पर्धा - त्यात गाणं आलं नृत्य ,आलं वादन आलं, चित्रकला आली, हस्तलेखन आलं आणि वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम, म्हणजे गाण्याचे - शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि दुसरं म्हणजे वादनाचे कार्यक्रम झाले तर फार सुसंस्कृत समाजाचं दर्शन घडेल.

शिवाय वकृत्व स्पर्धा झाल्या पाहिजेत जर आपण लोकमान्यांच्या वारसा सांगत असू तर वकृत्व स्पर्धा झाल्याच पाहिजेत. चांद्रयानाचे देखावे दोन ठिकाणी होते. विक्रम लँडर आणि प्रग्यान रोव्हर हे दिसत होते . एक लक्षात ठेवलं पाहिजे की एका घरगुती देखाव्यात चांद्रयानाच चक्क वर्किंग मॉडेल होते. तसे वर्किंग मॉडेल या सार्वजनिक देखाव्यांत सुध्दा दाखवता आलं असतं. सूर्ययान आदित्य ep१ हा काय कन्सेप्ट आहे हे दाखवणे जरी कठीण असले तरी ते एक आव्हान होते.

कुठेतरी ते दिसले असते तर बर वाटल असतं.

याच अनुषंगाने असं वाटतं की ऑडिओ व्हिज्युअल मीडियाचा चांगल्या प्रमाणात वापर करून घेता येऊ शकतो. देखावे आणि त्यांचं प्रकटीकरण आणि अंधारात थोडेसे लायटिंग इफेक्ट्स व बरोबर ध्वनीमुद्रित आवाज हे आता फार जुनं झालं आहे तरी आता काहीतरी नवीन करायची गरज आहे.

टिळक मंदिराचा गणेशोत्सव फार पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. पारंपारिक आरती होते पण वाईट एकाच गोष्टीच वाटतं की प्रेक्षक कार्यक्रमाकडे पाठ का फिरवतात हे कळत नाही.लोकमान्य सेवा संघातर्फे या कार्यक्रमांची जाहिरात अधिक प्रभावी व्हावी. त्यांची विसरजणाची मिरवणुकसुध्दा फार देखणी असते. सुरुवातीला महालक्ष्मी मंदिराशी थांबून देवीची आरती होते त्यानंतर विजय स्टोरेज चे साठे यांच घर अशी चौका चौकात थांबत ही मिरवणूक पुढे वाटचाल करते. यावर्षी सुद्धा पावसाला न जुमानता मिरवणूक फार रंगली. विशेष म्हणजे अति उत्साहाने जेष्ठ भगिनी व बांधव यांनी देखील मिरवणूकीत सक्रिय भाग घेतला. वजनदार झांजा आणि ढोल तासे वाजवण्यात त्यांचा उत्साह ओसंडून जात होता. एका भगिनीने समारोपाच्या आरतीला उत्कृष्ट तबला वादन केले आणि विसर्जनाच्या मिरवणुकीतही तालबद्ध ढोल ताशा वादन केले. या तालावर बच्चे कंपनीने लेझीम चे फारच सुंदर प्रात्यक्षिक केले. सर्व कार्यकरते मस्तकी गांधी टोपी घालून मिरवणुकीत स्वत: सहभागी झाले होते. मला स्वत:ला देखील प्रथमच मिरवणूकीचा संपूर्ण अनुभव घेता आला. संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षात आणि शतक महोत्सवी गणेशोत्सवात जनतेला लोहचुंबकासारख आकर्षित करण्याची ही नामी संधी होती. अध्यक्ष मुकुंद फाटक स्वत: नित्यनियमाने सर्व व्यवस्था बघत होते. विसर्जनाच्या मिरवणुकीत त्यांनी म्हटलेले नित्य नवे श्लोक म्हणजे एक पर्वणीच होती तर तरूणाईचं प्रतिनिधित्व विवेक म्हस्कर प्रभावीपणे करत होता. सरते शेवटी अतिशय



शिस्तीने मंदिराच्या प्रांगणात श्रींचे विसर्जन संपन्न झाले. असा हा गणेशोत्सव उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा ही स्वत: श्रींच्याच चरणी प्रार्थना .



**डॉ. अविनाश ठाकूरदेसाई**
९८२०२८२१०१

**Discover Your Perfect Partner with Bhagyaroop Vivah, Where Tradition Meets Modern Matrimony!**

In the realm of modern matrimony, Bhagyaroop Vivah is your trusted guide, balancing your contemporary desires with timeless traditions. We understand your journey is unique, and so is your life partner. Discover the harmony of love and compatibility with us.



- Serving the Hindu community across countries and cultures.
- Rapidly growing platform balancing tradition and innovation.
- Curated matches based on personal preferences.
- Personalized matrimony services that offer a secure and interactive experience
- Emphasis on verified profiles for authenticity.
- A secure and stress-free environment for interactions.
- Exclusively catering to educated never-married graduates and post-graduates.

भाग्यरुप विवाह

Contact us at:
www.bhagyaroopvivah.com
+91-9209247183 / +91-9769338475

Follow us on:
/bhagyaroopvivah1
/bhagyaroopvivah

# विसरलेले समाज ७ : सेल्कनाम आणि यामाना

देशोदेशी

आज मी ज्यांच्याबद्दल लिहिणार आहे, त्यांना 'विसरलेले' म्हणण्यापेक्षा 'मुद्दाम नामशेष करण्यात आलेले' असं म्हणायला पाहिजे आणि ते समाज इतक्या पद्धतशीरपणे नष्ट करण्यात आले की मी ते जिथे हजारो वर्ष नांदले त्या भागात २ पूर्ण दिवस फिरून सुद्धा, त्यांनी मागे ठेवलेला एकही अवशेष मला फोटो काढण्यासाठी सापडला नाही. त्यामुळे ह्या लेखात फक्त त्यांच्या मातृभूमीचे आणि त्यांचं अस्तित्वच पूर्णपणे नाकारणं शक्य नसल्यामुळे, काहीश्या नाखुशीने त्यांचा उल्लेख असलेल्या अर्वाचीन काळात उभारलेल्या स्मारकाचे फोटो तुम्हाला दिसतील.

मी मुळात उशुआईया **(पहा पहिला फोटो)**



ह्या पृथीवरील सर्वात दक्षिणेचं गाव मानलं जाणाऱ्या ठिकाणी गेलो होतो, अंटार्क्टिकाला जाणारं आमचं जहाज पकडायला. पण शाळेत असताना मॅजेलान ह्या दर्यावर्दी कप्तानाच्या धाडसी सफरीचं वर्णन वाचल्या पासून त्याने 'टेरा डेल फ्युएगो' किंवा मराठीत 'ज्वलंत भूमी', असं नाव दिलेला हा प्रदेश कधीतरी पाहण्याचं डोक्यात होतं. त्यामुळे मुद्दाम इथे फिरायला मी २ अतिरिक्त दिवस हातात ठेवले होते. **पहा पुढचे ३ फोटो - १ आणि २.** बीगल चॅनेल







(बीगल नावाच्या ब्रिटिश नौदलातील जहाजाच्या नावावरून हे नाव पडलं. चार्ल्स डार्विनने आपला ऐतिहासिक प्रवास - ज्यात त्याला त्याच्या उत्क्रांतीवादाला पुष्टी देणारे सबळ पुरावे मिळाले- ह्याच जहाजातून केला), ३. लेक अकिगामी.

मॅजेलान दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोकाच्या ह्या भागात पोहचला १५२० साली, त्या आधी कमीत कमी ७ ते ८ हजार वर्ष तरी इथे मानव वस्ती होती ह्याचे ठोस पुरावे मिळाले आहेत. इतक्या पुराणकाळात काही मी शिरणार नाही. पण जेव्हा युरोपियन लोकांचा प्रथम संपर्क येथील समाजाशी झाला तेव्हा टेरा डेल फ्युएगोच्या ह्या भागात प्रामुख्याने सेल्कनाम (किंवा ओना) आणि यामाना (किंवा याघन) ह्या दोन जमातीचे लोक राहत होते. दोन्ही मुख्यत: भटक्या आणि शिकार करून उपजीविका करणाऱ्या निसर्गपूजक जमाती होत्या. टेरा डेल फ्युएगोचा हा प्रदेश एक सलग भूभाग नसून अनेक लहान मोठ्या बेटांचा समूह आहे. यामाना (आणि सेल्कनाम सुद्धा) आपल्या होडक्यामधून मासेमारी किंवा सील अथवा व्हेल अश्या जलचरांची शिकारही करण्यातही पटाईत होते.

सेल्कनाम लोकांची स्वत:ची ओना नावाची भाषा होती - बोली भाषा फक्त. त्यांची स्वतंत्र लिपी नसल्यामुळे लिखित भाषा मात्र नव्हती. १९व्या शतकात युरोपिअन मानववंशशास्त्रज्ञांनी ओना जिवंत राहावी म्हणून रोमन लिपीची ओना भाषेशी सांगड घालायचा प्रयत्न केल्यामुळे सेल्कनाम समाज नष्ट झाला असला तरी थोडीफार त्यांची भाषा, रीतीभाती किंवा मिथकं आणि आख्यायिका ह्या संबंधी माहिती टिकून राहिली.

केनॉस नावाच्या आदीशक्तीने त्यांचं हे जग निर्माण केलं होतं. आणि तेमाउकेल ह्या जगन्नियंत्या देवाच्या देखरेखीखाली मानवासह सर्व प्राणिमात्र सभोवतालच्या निसर्गाशी सौहार्दपूर्ण संबंध ठेऊन सुखाने राहत होते. हैन नावाचा त्यांचा उत्सव म्हणा किंवा धार्मिक विधी म्हणा, वेळोवेळी पाळला जाई. मुख्यत: नुकत्या वयात येणाऱ्या तरुणांची समाजाचे जबाबदार सदस्य होण्याची पात्रता त्यात तपासली जाई. निसर्गातील चांगल्या आणि वाईट अश्या दोन्ही शक्ती कशा ओळखाव्या आणि वाईट शक्तींशी कसा सामना द्यावा ह्याचं शिक्षण (आणि परीक्षा सुद्धा) समाजातील प्रौढ आणि अनुभवी लोकं नाट्यरूपात (अश्या शक्तींची सोंगं आणून) देत. निसर्गाशी एकजीव होऊन राहणं ह्या पलीकडे त्यांना काही माहित नव्हतं, आणि आपल्या मातृभूमी बाहेरच्या जगातील घडामोडींशी त्यांना काही देणं-घेणं सुद्धा नव्हतं. यामाना जमातही असंच काहीसं जीवन जगणारी होती.

मॅजेलानच्या सागरी मोहिमेमुळे जरी १६व्या शतकाच्या सुरुवातीलाच युरोपिअन लोकांचा पहिला संपर्क सेल्कनाम आणि यामाना बरोबर झाला असला, तरी पुढील दोन शतकं त्यांचं जीवन पूर्वापार चालत आलं होतं तसंच राहिलं. त्यांच्या पद्धतशीर शिरकाणाला सुरुवात झाली ती स्पॅनिश वसाहती आजच्या इक्वेडोर, पेरू, अर्जेन्टिना पासून अधिकाधिक दक्षिणेला पसरू लागल्यावर म्हणजे १९व्या शतकाच्या सुरुवातीला. उत्तरेकडून हा 'प्रगत' मानवांचा लोंढा इथे पोचला तो दोन कारणांसाठी. पाहिलं कारण म्हणजे सोनं. चिले देशाच्या रमोन मॉन्टेनारने टेरा डेल फ्युएगोमध्ये काढलेल्या शोध मोहिमे नंतर ह्या भागात सोनं मुबलक मिळतं अशी भुमका उठली. आणि चट्कन श्रीमंत व्हायच्या लोभाने संधीसाधू लोकांची रीघ इकडे लागली. प्रत्यक्षात सोनं थोड्यांच्याच हाताला लागलं. आणि दुसरं कारण म्हणजे शेतकरी आणि मेंढपाळ (लोकर आणि मटण ह्या दोन्हीसाठी मेंढ्या पाळण्याचा धंदा अर्जेन्टिना आणि चिले मध्ये ह्या काळात जोरात सुरु झाला होता) शेत-जमिनी आणि गुरं-चराई साठी कुरणं शोधत मोठ्या संख्येने इथे आले.

दोन्ही गटांच्या समोर मुख्य अडचण होती - इथल्या जमिनींचे मूळ मालक आणि हजारो वर्षांचे रहिवासी सेल्कनाम आणि यामाना. त्यांना सोन्याचा लोभ नव्हता, आणि रोजचं जेवण शिकार करून मिळावं एव्हढीच माफक अपेक्षा आयुष्याकडून असल्यामुळे शेती/मेंढपाळी सारखे उद्योग करून श्रीमंत होण्याची महत्वाकांक्षाही नव्हती. त्यामुळे इथे आपलं बस्तान बसवू पाहणाऱ्या स्पॅनिश लोकांना त्यांना कसल्याही मोहात पाडून त्या बदल्यात त्यांची भूमी हिरावून घेणं शक्य नव्हतं.

मात्र सगळ्या जगात 'आपणच काय ते पुढारलेले' हा अहंकार त्या काळातील युरोपिअन समाजात एव्हढा सखोल रुजलेला होता, की युरोपिअन दृष्टिकोनातून आपल्यापेक्षा भिन्न जीवनशैली असलेल्या समाजांना जंगली जनावरांच्या पेक्षा सांस्कृतिक दृष्ट्या फारसं वरच्या दर्जाचं मानलं जात नसे. त्याचं एकच उदाहरण देतो. चार्ल्स डार्विन सारख्या उदारमतवादी, विचारवंताने सुद्धा टेरा डेल फ्युएगोच्या मूळ राहिवाशांचं वर्णन 'दयनीय, निकृष्ठ, रानटी' ('the miserable, degraded savages whom we first met here') अश्या शब्दात आपल्या प्रवासवर्णनात केलं आहे.

आणि एकदा स्थानिकांना जंगली जनावरच्या पेक्षा फारसं वेगळं मानायची गरज नाही असं सोईस्करपणे ठरल्यानंतर त्यांच्या शिकारीसाठी पद्धतशीर काढण्यात आल्या. आपल्या शेतीची नासधूस करणाऱ्या एखाद्या रानडुक्कर किंवा रानरेड्यासारखीच सेल्कनाम लोकांची शिकार करण्यात काही नैतिक दृष्ट्या चुकीचं आहे असं मानण्याचीही गरज उरली नाही. जास्तीत जास्त स्थानिक लोकं कोण मारतो अशी चढाओढ लावून किती लोकं ठार मारले त्यानुसार इनामं सुद्धा देण्यात आली. त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार, बंदिवान करून गुलामासारखे वागवणे, सर्कशीतल्या जनावरांसारखं पिंजऱ्यात डांबून जगभर त्यांचं प्रदर्शन मांडणे - तुम्ही कल्पना (आणि केवळ कल्पनाच) करू शकाल अश्या प्रकारचं दुराचरण त्यांच्या बरोबर केलं गेलं.

भरीस भर म्हणजे युरोपिअन लोकांनी आपल्या बरोबर आणलेल्या संसर्गजन्य रोगांविरुद्ध प्रतिकारशक्ती त्यांच्या देहात कधीच विकसित झाली नव्हती. त्यामुळे निर्माण झालेल्या रोगराईच्या साथीत, विशेषत: यामाना लोकं मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडले.

काही मूठभर स्थानिक लोकं अँग्लिकन धर्मगुरूंनी फॉकलंड बेटांजवळील एका लहानश्या बेटावर स्थलांतरित केल्यामुळे काही अधिक दशकं तगून राहिले. पण आजमितीला दोन्ही जमाती पूर्णपणे नामशेष झालेल्या आहेत. आणि त्यातील विरोधाभास असा आहे की डोडो पक्षी किंवा टास्मानियन वाघ किंवा अशाच प्रजाती नष्ट झाल्यावर किंवा विनाशाच्या काठावर आहेत असं लक्षात आल्यावर आज जसा गदारोळ होतो आणि त्यांच्या संवर्धनासाठी जसे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकल्प सुरु होतात, तसं काही ह्या सेल्कनाम आणि यामानांच्या विनाशाबद्दल झाल्याचं फारसं ऐकिवात आलेलं नाही.

उशुआईयाच्या बंदरासमोरच एक अतिशय सुंदर स्मारक आहे - त्याचं नाव आहे Monumento ea los Pioneros y Antiguos Pobladoeres - 'मूळ रहिवासी आणि आद्यप्रवर्तक ह्यांचे स्मारक'. अल्बाट्रॉस ह्या येथील समुद्र-पक्ष्याच्या फैलावलेल्या





पंखांच्या आकाराचं. **पहा शेवटचे दोन फोटो.** त्याचा आकार आणि बांधणीतून प्रतीत होते कुठल्याही अज्ञात, अदम्य जागी पोचल्यावर एखाद्या प्रवाश्याला ज्याची सर्वात मोठी आशा असते तशी एखाद्या आश्रयस्थानाची सुरक्षितता आणि शांतता. स्मारकावर चितारलेल्या भित्तिचित्रांतून उशुआईयाच्या उभारणीचा इतिहास दाखविण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे, त्यात येथील मूळ रहिवासी आणि येथे स्थायिक होण्यासाठी आलेले युरोपियन कसे परस्पर सहकार्याने येथे राहत होते अशीही चित्रं आहेत! सौहार्द? सहकार्य? ज्यांना येथून जबरदस्तीने विस्थापित करूनच उशुआईया उभारलं गेलं त्यांच्या बरोबर?

ह्याच स्मारकाच्या मागच्या बाजूला एक पाटी आहे. त्यात उशुआईयाच्या स्थापनेत मोठा सहभाग असलेल्या येथील मूळ रहिवाश्यांपैकी ५० कुटुंबांना श्रद्धांजली वाहिलेली आहे. त्यात येथील मूळ रहिवासी आणि ज्या भूमीवर आजचं उशुआईया उभं आहे त्यापैकी एकाही सेल्कनाम कुटुंबाचा उल्लेख नाही!

पान ९ वर

# ‘बालजल्लोष’ कार्यक्रम आनंदात व उत्साहात साजरा

बाल दिनाचे औचित्य साधून विलेपार्ले येथे दुभाषी मैदान (प्लेग्राउंड) साबरी प्रतिष्ठानच्या वतीने ९ ते १४ या दिवशी बाल जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अनेक लहानमुलं मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने सहभागी झाले होते. तसेच कार्यक्रमादरम्यान झालेल्या किल्ले स्पर्धा,



वेशभुषा, एकपात्री, रस्सी खेच, लंगडी, दोरी उडी, सूर्य नमस्कार, चित्रकला, नृत्यस्पर्धा, पत्र लेखन तसेच विशेष आकर्षण कुस्ती स्पर्धा अशा स्पर्धांमध्ये लहानग्यांसह ज्येष्ठांनीही सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमात श्री संजय उपाध्ये, श्री सुहास आडीवलेकर, श्री अवधूत वाघ, वीणा भागवत, श्री.संदीप दळवी, डॉ. शशिकांत वैद्य , श्री. राजेश टेके, श्री. बाळा सरोदे, श्री. मिलिंद करमळकर, स्मिता पुराणिक, अमित परसतवार ,सहदेव सावंत, दीपक परब इत्यादी मान्यवर लाभले होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस आणि मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.याचबरोबर देश भक्तीपर गीते, मलखांब, रॅपलिंग झिपलाइन, दीपोत्सव या कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. तसेच ग्रामीण आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना आपल्या मार्फत मदत मिळण्यात यावे यासाठी आनंदाचे विद्यालय सुरू करण्यात आले आहे. मागील १५ वर्षांपासून सतत पार्ल्यात बाल जल्लोषचे आयोजन करण्यात येते, या संपूर्ण कार्यक्रमात साबरी परिवारातील पराग सुर्वे,तेजस पाटील, यादि्नक चव्हाण, संतोष शिदम, विनायक घाणेकर, दीपक नेवरेकर, संदीप शिदम, मंगेश मामा घाडगे,राहुल चव्हाण, सितेश वारिसे,



ऋषिकेश, दिवेश घाडगे,अंकित नाईक,सुयोग वैद्य,सुरेश बोरुले,विशांत जाधव, सचिन सुर्वे,दत्ताराम जाधव,नूतन सुर्वे, राधिका चव्हाण,




अपूर्वा यादव, निहारिका घोलम,स्नेहल शिदम, सूरज शिदम, यश सुर्वे, विशेष अशी कामगिरी केली आहे.

# पार्ल्यातील वृक्षवैविध्य

## रिठा




आज आपण भारतीय उपखंडात तसा सहज आढळणारा व विलेपार्ल्यात पूर्वेला दोन ठिकाणी दिसून आलेला एक अत्यंत उपयोगी वृक्ष बघणार आहोत. हा आहे रिठा Sapindus trifoliatus Family: Sapindaceae Indian Soap-nut tree. हा तसा मोठा वाढणारा वृक्ष. ह्या वृक्षाची पाने संयुक्त असून टोकाची पर्णिका जास्त मोठी असते याला जानेवारीच्या सुमारास लहान हिरवट पांढर्या फुलांचे तुरे येतात. कच्ची फळे हिरवी व पक्व काळसर तपकिरी असतात.

फळातील सॅपोनीन ह्या द्रव्यामुळे फळ पाण्यात कुस्करल्यास पाण्याला भरपूर फेस येतो. ही फळे कपडे धुण्यासाठी, सोन्या-चांदीचे दागिने स्वच्छ करण्यासाठी वापरतात. ह्याची फळे विष रोधक, प्रसूती सुलभ करणारी, मुर्छा उतरवणारी, पोटातील कृमींचा नाश करणारी दमा कमी करणारी, कफनाशक अशा अनेक प्रकारे औषधी मानली जातात.


विलेपार्ल्यात फिरोजशा मेहता रस्ता व दिक्षित रस्ता जिथे एकमेकांस छेदतात तिथे असलेल्या सुरेश सायकल मार्ट जवळ तसेच परांजपे बी [illegible] पोलीसचौकी जवळ अशा दोन ठीकाणी हे वृक्ष आहे.



श्रीकांत सावरकर
९२२३३१४९०९

पान ८ वरून

## विसरलेले समाज ७ : सेल्कनाम आणि यामाना



पण ही काही फक्त उशुआईयाचीच कथा नाही. सर्व दक्षिण अमेरिकेतील मूळ रहिवाश्यांना जवळजवळ अशीच वागणूक देण्यात आली. आणि आज त्या मूळ रहिवाश्यांची स्मारकं ठिकठिकाणी तुम्हाला दिसतील. पण त्यांसंबंधी खाली मी एका निबंधाची लिंक दिली आहे, त्यावर क्लिक करून तो निबंध जरूर वाचा - ह्या स्मारकांच्या दिखाऊ फोलपणा अतिशय विदारकपणे त्या निबंधात वर्णन केलेलं सापडेल.

सतीश जोशी
९८२०२२८२७९

dial4cleanhome.com
ONE STOP SOLUTION FOR CLEANING & HOUSING NEEDS.







आपण भारतात असाल की परदेशात, घराची स्वच्छता आता एका फोनच्या अंतरावर!

दिवाळी संपली की विदेशी स्थायिक भारतीयांना भारतातील आपल्या नातेवाईकांना आणि मित्रांना भेटण्यासाठी भारतात जाण्याचे वेध लागतात. मग त्यांच्या भारतातील नातेवाईकांची लगबग सुरू होते आणि त्यातील महत्वाचे काम असते घराची साफसफाई करून घेण्याचे.

काही जेष्ठ नागरिक आपल्या मुलांकडे परदेशी राहत असतात आणि तिथे थंडीची चाहूल लागताच काही महिन्याकरीता भारतात परततात. त्यांची घरे बरेच महिने बंद असतात आणि अशा घरांची साफसफाई करून घेणे अगदी "मस्ट".

मग ही साफसफाई करायची कोणी? इथे राहणारी माणसे तरी त्यासाठी रिकामी आहेत का? त्यांचीही ऑफिस आणि घर दोन्ही सांभाळण्याची तारेवरची कसरत चालू आहेच. घरच्या कामवाल्या मावशींना हे काम सांगावे तर त्यांच्याकडून ते काम कितपत धड होणार याची काहीच खात्री नाही, त्या जमीन पुसतील, पण भिंती कोन साफ करणार, खिडकयांच्या काचा बाहेरून कशा साफ करणार, सोफ्यावर पडलेले डाग कसे काढायचे? असे एक ना अनेक प्रश्न.

आता याची चिंता करण्याचे कारण नाही. उत्तर सोपं आहे

Dial4cleanhome.com

आज आमचे अनेक ग्राहक की ज्यांची इथली घरे बंद आहेत ते भारतात परतण्या पूर्वी आम्हाला संपर्क साधून अपॉइंचमेंट फिक्स करतात आणि त्या दिवशी त्यांच्या घराची चावी आमच्यापर्यंत पोहोचणयाची व्यवस्था करतात. ते विश्वासाने आमच्याकडे घराची चावी देतात आणि आम्ही तेवढ्याच जबाबदारीने त्यांचे घर स्वच्छ करून देतो.

आता काळजी मिटली आहे.
आपण भारतात असाल की परदेशात,
घराची स्वच्छता आता एका फोनच्या अंतरावर.

Contact : +91 99205 61736
www.dial4cleanhome.com

dial4cleanhome.com dial4cleanhome.com dial4cleanhome.com

# नाळ २

सध्या मराठी चित्रपटात सुद्धा सिक्वल चा ट्रेंड आला आहे. 'नाळ' या मराठी चित्रपटाचा सिक्वल सुद्धा याच महिन्यात प्रदर्शित झाला आहे. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुधाकर रेड्डी यंकट्टी दिग्दर्शित 'नाळ' या चित्रपटाने अभूतपूर्व यश प्राप्त केले. राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले.

त्या इवल्याशा गोड 'चैतू' ने प्रेक्षकांच्या मनात घर केले. मात्र ही कथा एका अशा वळणावर येऊन थांबली, जिथे अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. तेव्हा न उलगडलेल्या या प्रश्नांची उत्तरे आता 'नाळ भाग २' मध्ये प्रेक्षकांना मिळाली आहेत.

'नाळ' मध्ये खऱ्या आईकडे निघालेला चैतू, त्याच्या खऱ्या आईकडे पोहोचणार का? त्यांच्यातील अबोला दूर होणार का?, याचे उत्तर आपल्याला 'नाळ भाग २' मध्ये मिळाले आहे. नागराज मंजुळे यांच्या चित्रपटात चित्रीकरण स्थळही एक व्यक्तिरेखा साकारत असते. याचा प्रत्यय 'नाळ भाग २' मध्येही येत आहे. ज्याप्रमाणे कलाकार इतक्या ताकदीचे दिसत आहेत, तितकेच चित्रीकरण स्थळही महत्वाची भूमिका बजावत आहे. नदी, दऱ्या, डोंगर, घरे असे निसर्गसौंदर्य चित्रपटात अतिशय सुरेखरित्या टिपण्यात आल्याचे दिसत आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक सुधाकर रेड्डी यंकट्टी म्हणतात, ''नाळ ची कथा

जिथे थांबते तिथून पुढे 'नाळ भाग २'ची कथा सुरु होते. नात्यांना जोडणारी, घट्ट बांधणारी ही कथा आहे.''



झी स्टुडिओज आणि नागराज पोपटराव मंजुळे निर्मित 'नाळ भाग २' दिवाळीत म्हणजेच १० नोव्हेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला असून या चित्रपटात श्रीनिवास पोकळे, नागराज मंजुळे, देविका दफ्तरदार, दिप्ती देवी, त्रिशा ठोसर आणि जितेंद्र जोशी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




# झिम्मा २

झिम्मा या चित्रपटाला खूप यश मिळाले होते आणि त्यानंतर आता 'झिम्मा २' सुद्धा प्रदर्शनाला सज्ज झाला आहे. जिओ स्टुडिओज आणि आनंद एल. राय प्रस्तुत, चलचित्र मंडळी निर्मित आणि हेमंत ढोमे दिग्दर्शित 'झिम्मा २' हा बहुचर्चित चित्रपट नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात येत आहे.

'झिम्मा' मधील या सात मैत्रिणींना प्रेक्षकांनी आपलेसे केले आणि बॉक्स ऑफिसवर सुपरहिटची मोहर उमटवली. महिलांना त्यांच्या अंतरंगाचा शोध या निमित्ताने घेता आला.




आयुष्यात स्वत:साठी काही क्षण देणे, किती आवश्यक आहे, याची जाणीव 'झिम्मा' ने करून दिली. हेच 'स्वत्त्व' शोधायला लावणारा हा चित्रपट पुन्हा जोमाने आपल्या मैत्रिणींच्या भेटीला येत आहे. धमाल, मस्ती आणि मनोरंजनाचा फंडा नव्याने अनुभवायला आणि जगणं नव्याने एन्जॉय करायला शिकवणारा हा सिनेमा आहे. सुहास जोशी, निर्मिती सावंत, सुचित्रा बांदेकर, क्षिती जोग, सायली संजीव आणि सिद्धार्थ चांदेकर या गेल्या भागातील कलाकारांसोबत आता रिंकू राजगुरू आणि शिवानी सुर्वे या दोघी देखील या तगड्या स्टारकास्टमध्ये दाखल झाल्या आहेत.सध्या या चित्रपटाचा टिझर गाजत आहे. रिंकू राजगुरू आणि शिवानी सुर्वे या दोन अभिनेत्री नव्याने या चित्रपटात असल्याने त्याबद्दल उत्सुकता वाढली आहे. सिद्धार्थ चांदेकर याचा एक संवाद टिझर मध्ये आहे की यावेळेला खूपच व्हरायटी आहे . हेच वैविध्य पाहण्यासाठी आपण देखील उत्सुक आहोत.

याबद्दल दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणतात, ''यापूर्वी प्रदर्शित झालेल्या 'झिम्मा' चित्रपटाला सर्वच वयोगटातील प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. अनेक पुरस्कारांवर चित्रपटाने मोहोर उमटवली. 'झिम्मा' पाहून अनेक महिलांनी, ज्या कधीही कुटुंबाशिवाय बाहेर फिरल्या नाहीत, त्यांनी स्वत: मैत्रिणींसोबत सहली आयोजित केल्या. प्रेक्षकांनी मेसेजद्वारे, प्रत्यक्ष भेटून आम्हाला 'झिम्मा २' यावा, अशी मागणीही केली. प्रेक्षकांच्या या प्रेमामुळेच आम्ही 'झिम्मा २' साठी प्रेरित झालो आणि चांगली कथा तयार झाली.''

दिवाळीची सुट्टी यावर्षी मराठी चित्रपटांच्या सिक्वल मुळे लक्षात राहील.



**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# Aggregators, Marketplaces - New Age Business Models

Let's look at typical conversation between husband and wife over years when they plan to go out.

Sixty years back: "Make sure to wear shoes and carry water bottle as we must walk a lot. Do we really need to go?"

Thirty years back: "Make sure the car is in good condition and carry the map. I will not push the car if it breaks down this time."

Now a days: "Book Uber in advance so that we can go in time and avoid last minute rate hikes."

The conversation shows how a simple need of reaching some place far away is being fulfilled over the years. Mankind has moved from scarcity to abundance to judicious "Pay per use" in this journey of few decades. This one example shows how we are moving towards smart usage of idle over capacity of resources.

We looked at UNICORNS and their rise and fall in the last article. While we looked at their businesses, we looked at only their valuation and their inclusion in the list. In this article we will try and look at different types of new age businesses and their characteristics in brief. New age businesses may be in multiple fields but one thing that connects them all in a way is the rise and use of technology. Many of these business ideas were just not possible without new technology. In most of the new business ideas creating avenues for bringing the buyer and seller together with help of technology is a prime mover. Let us look at different models.

As manufacturer cannot reach all consumers, secondary persons or traders came in. A trader is an accepted middleman between sellers and buyers. A trader still must reach and have a trust on sellers and buyers to make a sale. Technology made this connect very easy and new age businesses became reality. In today's world physical presence is not mandatory. However, since the sellers and buyers are distributed, they need help in ensuring a connect and commercial transaction. Thus, third party and fourth party business models have emerged in digital commerce age. To ensure digital commerce gives desired results new models have come in. Most business models have tried to answer the basic question in today's fast paced life. How can it become more convenient and less time consuming for a customer to fulfill his/her needs.

In new age two main models have emerged, "Aggregator" model and "Market Place" model.

Aggregator model:



An aggregator is essentially an entity which creates a brand for many distributed sellers and ensures a minimum acceptable quality and delivery for a consumer at a reasonable price. Here the aggregator does not own the individual provider businesses. He ensures the contracted provider of products or service delivers as promised and builds his own brand. The providers work under a single umbrella of the aggregator and provide standardized product and services when demanded. The aggregator first creates partnerships with all providers and then enters market with a promise of a stated quality at a reasonable price. Aggregator makes profits in commission as per terms with the providers. Consumers benefit from aggregator model as they offer faster and efficient data, lower costs, good user experience and standardized service.

There are multiple types of businesses where aggregator model has been successfully used.

The different types can be broadly described as follows.

Search Aggregators: As the name suggests collates and presents searched items. Best example is Google, Bing, Yandex, Ask etc.

Review Aggregators: Collates reviews from all websites about products and services.

Best example could be Amazon, Yelp and Tripadvisor

News or Content Aggregators: These collate all the news and content and categorise them.

Notable examples of these include Reddit, Bing News, Google News, Techmeme etc.

Shopping Aggregators: As the name suggests these sites collate all the new deals and offers on almost all products and services. These also provide some advisory services to consumers.

Best examples are Shopping .com, Price Grabber, Shopzilla, Google Shopping etc.

Food Delivery Aggregators: As the name suggests these entities deliver food items from multiple restaurants and outlets to home.

Best examples are Swiggy, Zomato etc.

Real Estate Aggregators: As the name suggests these are sites where you can find property related availability and deals information. They also provide advisory and categorized data points.

Good examples are Housing.com, Magic bricks, Zillow, 99 Acres etc.

Job Aggregators: Very interesting collators of jobs available and organizers. Job seekers can get real value in a quick time.

Best examples are Google Jobs, Indeed, SimplyHired, Naukari etc.

Wedding aggregators: These providers basically help in planning weddings in all aspects. They offer best services at reasonable costs and ensure things will happen in time.

Best examples are WeddingZ.in, ZoWed, ShaadiSaga etc.

There are multiple areas in business that are getting in to aggregator model mode very soon.

In addition to above the best-known examples of aggregator model are Airbnb and Uber.

Market Place Model:

The model is quite like a mall where individual sellers are conducting their businesses while the customers entering the mall have a wide choice. Market place makes search easy and provides user reviews and ratings for customers to make choices. Contrasting with the aggregator model is a Market place model where the individual providers are allowed to keep their brand and provide products and services in their own defined way. The market place maker provides access to customers and transactions go through them. A minimum acceptable delivery is ensured for all options and payments are routed through only one channel.

Best examples of Market Place model are Amazon, eBay etc.

While there are huge number of startups based on these models only a few will survive the test of time and sustainability. Customers are likely to gain from all these making it more convenient and economical for them to fulfil their needs.



**मिलिंद जोशी**
९८१९७ ९७२५८